262

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२३, मुंबई, दिनांक २१/०२/२०२४

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-०८२३/प्र.क्र.१३०/पोल-३ दिनांक १६ फेब्रुवारी, २०२४.

**विषय :-** राज्य पोलीस दलास कायदा अंमलबजावणीचे कार्य अधिक प्रभावीपणे करता यावे म्हणून " Artifcial Intelligence " चा वापर करण्याच्या दृष्टीने " Special Purpose Vehicle (SPV) " ची स्थापना करण्यास तत्त्वत: मान्यता देण्याबाबत.

******

**परिपत्रक -**

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-०८२३/प्र.क्र.१३०/पोल-३, दिनांक १६ फेब्रुवारी, २०२४. ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२४०२१६१८४५३९०९२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

पोलीस आयुक्त, नागपूर शहर
विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र, नागपूर.
पोलीस अधीक्षक, नागपूर (ग्रामीण).

प्रत,

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके मध्ये " वित्त व लेखा " या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.



Scanned with CamScanner

राज्य पोलीस दलास कायदा अंमलबजावणीचे कार्य अधिक प्रभावीपणे करता यावे म्हणून *"Artificial Intelligence"* चा वापर करण्याच्या दृष्टीने *"Special Purpose Vehicle (SPV)"* ची स्थापना करण्यास तत्त्वत: मान्यता देण्याबाबत.

## महाराष्ट्र शासन
## गृह विभाग

**शासन निर्णय क्र. संकीर्ण-०८२३/प्र.क्र.१३०/पोल-३.**
दुसरा मजला, मंत्रालय, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई. पिन-४०००३२.
दिनांक : १६ फेब्रुवारी २०२४.

**शासन निर्णय.**

राज्य पोलीस दलास कायदा अंमलबजावणीचे कार्य अधिक प्रभावीपणे करता यावे म्हणून *"Artificial Intelligence"* चा वापर करण्याच्या दृष्टीने, एका *"Special Purpose Vehicle (SPV)"* ची पुढील अटींवर स्थापना करण्यास, शासनाने तत्त्वत: मान्यता दिली आहे:-

१) वरीलप्रमाणे "SPV" स्थापन करण्याच्या प्रयोजनासाठी,-
(१) राज्य शासन;
(२) भारतीय व्यवस्थापन संस्था, नागपूर, व
(३) मे. पिनाका टेक्नोलॉजीज खाजगी मर्या.

या तीन पक्षांमध्ये करार करण्यात यावा.

२) उक्त *"Special Purpose Vehicle (SPV)"* हे १०० टक्के शासन भाग भांडवल असलेली, शासन मालकीची, *"Maharashtra Advanced Research and Vigilance for Enhanced Law Enforcement (MARVEL)"* या नावाने खाजगी मर्यादित कंपनी म्हणून नोंदणीकृत करण्यात यावे.

३) पोलीस अधीक्षक, नागपूर (ग्रामीण), हे उक्त कंपनीचे पदसिद्ध संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी असतील आणि ते थेट शासनाच्या (गृह विभागाच्या) अधिपत्याखाली काम करतील.

४) संचालक, भारतीय व्यवस्थापन संस्था, नागपूर, हे उक्त कंपनीचे पदसिद्ध संचालक असतील आणि कंपनीचे इतर संचालक हे शासन नामनिर्देशित करेल.

५) उक्त "SPV" कंपनी स्वत:चा खर्च भागविण्यास सक्षम होईपर्यंत राज्य शासनाकडून उक्त कंपनीस आवर्ती खर्च म्हणून रु.२.५ कोटी आणि अनावर्ती खर्च म्हणून रु.१.७० कोटी (अधिक वस्तु व सेवा कर) इतका निधी उपलब्ध करुन देण्यात यावा.

२. उक्त "SPV" करिता येणारा खर्च हा गृह विभाग, मागणी क्र.बी-१, २०५५ पोलीस, ००,११५ पोलीस दलाचे आधुनिकीकरण, (०१) विविध तंत्रज्ञान विकास प्रकल्प, (०१)(०१) विविध तंत्रज्ञान विकास प्रकल्प (कार्यक्रम), ५२ यंत्रसामग्री व साधनसामग्री (२०५५ए०३२), या लेखाशीर्षाखाली उपलब्ध अनुदानातून भागविण्यात यावा.

Scanned with CamScanner

३. हा शासन निर्णय, वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८, भाग पहिला, उप विभाग तीन, अ.क्र.४, *"(अ) योजनेला किंवा प्रस्तावाला प्रशासकीय (वित्तीय मंजुरी धरुन) मान्यता देणे"* या वित्तीय शक्तीच्या बाबतीत प्रशासनिक विभागास प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

४. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२४०२१६१८४५३९०९२९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SWAPNIL GOPAL BORSE

Digitally signed by SWAPNIL GOPAL BORSE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT,
2.5.4.20=c6a6e7cad855fc787a96e36f11fbc87a9f66cfd9bad01184493f2735ad885627, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=8538CD1E408948F7D025537D5F6589BD8958D1B95322E66D2CC5EDF89AD0D79E, cn=SWAPNIL GOPAL BORSE
Date: 2024.02.16 18:56:41 +05'30'

**( स्वप्निल गोपाल बोरसे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१) मा. राज्यपाल यांचे सचिव, राज भवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. उप मुख्यमंत्री (गृह) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. उप मुख्यमंत्री (वित्त) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) पोलीस महासंचालक व महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
६) संचालक, भारतीय व्यवस्थपान संस्था, नागपूर.
७) पोलीस अधीक्षक, नागपूर (ग्रामीण).
८) मे. पिनाका टेक्नोलॉजीज खाजगी मर्या. *[पोलीस अधीक्षक, नागपूर (ग्रा.) यांच्या मार्फत]*

**प्रत-**

१) मा. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
२) अपर मुख्य सचिव (गृह) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
३) प्रधान सचिव (अपील व सुरक्षा) यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) प्रधान सचिव (विशेष) यांचे स्वीय सहायक, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.

**प्रत-**

१) प्रधान महालेखापाल (लेखा व हकदारी/लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर.
२) जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर.
३) कार्यासन अधिकारी (व्यय-७), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) निवड नस्ती, पोल-३.



Scanned with CamScanner